
ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : III ISSUE IV Jan.-Mar.2020




ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**● Editor ●**

**Dr. Sarkate Sadashiv Haribhau**

**● Mailing Address ●**

**Dr. Sadashiv H. Sarkate**

Editor POWER OF KNOWLEDGE

Head of Dept. Marathi

Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431143 (M.S.)

Cell. No. 9420029115 / 7875827115

Email : powerofknowledge3@gmail.com,

Shsarkate@gmail.com

**Web Site : www.power of knowledge.co.in.**

**Price : Rs. 300/-**

**Annual Subscription: Rs. 1000/-**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Studies On Incidance Of Infection And Intensity Of Infection Of Cestode Stilesia From Capra Hircus | GARAD V. K.<br>BHOGIL A. R. | 1-10 |
| 2 | Impact Of E-Education On Indian Present Education | Dr. Chandrakant W. Gajewad | 11-13 |
| 3 | A Study Of Differences In Intelligence, Family Climate, School Environment, Study Habits And Academic Achievement Of Students In Vidarbha Region In Relation To Area And Sex . | Prof. Shweta T. Aglawe | 14-19 |
| 4 | The Portryal Of India As Nation In Crisis In Anandmath | Jadhav Jaishree Shivajirao | 20-23 |
| 5 | Impacts of Human Trafficking | Pornima Omprakash Dagdiya<br>Prof. Dr. Aparna Kotapalle | 24-27 |
| 6 | Digital Marketing | Dr.Vidyullata Rahul Hande | 28-32 |
| 7 | Historical Background, Cultural and Physiographical Aspects of Beed District (MS) India. | Dr. V.L. Phad | 33-39 |
| 8 | खेळाचे मानसशास्त्र | डॉ.सोनकाटे आप्पाराव सायबण्णा | 40-42 |
| 9 | महानुभाव साहित्यातील पद्यग्रंथःसातीग्रंथ | डॉ.विनोद अवधूतराव कोकणे | 43-50 |
| 10 | मराठी पंडित कवी : विठ्ठल बीडकर | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 51-53 |
| 11 | शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात प्रधानमंत्री पीक योजनेचे महत्व | प्रा. डॉ. व्यंकटेश काळूराम मदनुरे | 54-58 |
| 12 | एक आदर्श राजा छत्रपती शिवाजीमहाराज | श्री. लहु बाबुराव राठोड | 59-61 |
| 13 | क्रांतीकारी महापुरुष - संत सेवालाल महाराज | श्री. लहु बाबुराव राठोड | 62-65 |
| 14 | भारत व अफगिस्तान संबंधावर दहशतवादाचा परिणाम परिणाम - एक अकलन | प्रा.प्रशांत सराफ | 66-70 |
| 15 | प्रदुषण : प्रकार, कारणे, परिणाम आणि उपायच्रा. | डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | 71-74 |
| 16 | मराठवाडयातील दुष्काळाची सद्यस्थिती | प्रा.डॉ.मुजमुले बी.एस | 75-78 |
| 17 | "सहज - सुलभ वाचन सवय हाच खरा स्त्री अलंकार | प्रा. ज्योती शा. मगर | 79-84 |
| 18 | "स्त्रियांच्या ओवीगीतातील कृषी अवजारे" | प्रा.डॉ.भा.ना.गाडेकर | 85-95 |
| 19 | आदिवासी समाज : जीवनविषयक दृष्टिकोन | डॉ. मुक्ता राजेंद्र आंभेरे | 86-101 |
| 20 | "भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्ष संकल्पना, पार्श्वभुमी, स्वरुप व महत्व | प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 102-104 |

Power of Knowledge Peer Review Journal,Volume:III, Issue:IV Jan to March 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# "भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्ष संकल्पना, पार्श्वभुमी, स्वरुप व महत्व

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
राज्यशास्त्र विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई, ता.गेवराई जि.बीड

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटीशांनी भारतात केलेल्या विविध प्रशासकीय सुधारणा, अधिनियमामुळे देशात लोकशाही राजकारणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधानकारांनी जगातील अनेक राज्यघटनांचा अभ्यास करुन आपल्या देशाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीत अनुकूल अशा पध्दती, तत्वे यांची शहानिशा करुन भारतीय संविधानात त्याचा समावेश केला. भारताचे संविधान तयार करण्यास तब्बल दोन वर्ष आकरा महिने आणि आठरा दिवस लागले. ते योग्य पध्दतीने लिहून झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाची अंमलबजावणी होवून खऱ्या अर्थाने भारत देश प्रजासत्ताक झाला. या संविधानानुसार भारतात आधुनिक संसदीय लोकशाहीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.

संसदीय लोकशाहीच्या तत्वानुसार विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ परस्पर धनिष्ठ संबंधित असून कार्यपालिकेची निर्मिती विधीमंडळातून होईल आणि कार्यपालिका आपल्या कार्याबद्दल विधिपालिकेस जबाबदार राहील यालाच संसदीय अथवा जबाबदार शासन पध्दती असे म्हटले जाते. भारतीय संविधानानुसार संसदीय लोकशाही म्हणजे संविधानानुसार संसदेची भूमिका, विधिनिर्माण शासनावर देखरेख व नियंत्रण ठेवणे हे होय. लोकशाही शासन व्यवस्थेत सत्ताधारी शासनाऐवढेच महत्व विरोधी पक्षाला प्राप्त झालेले असते. ऐवढेच नव्हे तर शासनकर्त्यांना योग्य दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त करण्याचे काम विरोधी पक्षाला पार पाडावे लागते.

**संसदीय लोकशाहीची भूमिका :-**

संसदीय लोकशाहीची भूमिका ही पक्षपध्दतीचे स्वरुप, नेतृत्व आणि पक्षाचे बहुमत अथवा अल्पमत यावरुन बदललेले असते. भारतात सार्वत्रिक निवडणुकास सुरुवात झाल्यापासून म्हणजेच सन १९५० ते १९९० या कालखंडाचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, सन १९७७, १९७९ आणि १९८९ या तीन शासनकाळातील राजकीय परिस्थितीचा अपवाद वगळता भारत देशात एकपक्ष पध्दती प्रभावी होती. या कालखंडात विरोधी पक्ष आपले कार्य प्रभावीपणे पार पाडू शकला नाही. केवळ विरोधासाठी विरोध या तत्वाने विरोधी पक्षांनी आपली भूमिका या काळात पार पाडली असेही आपणाला म्हणता येणार परंतु विरोधी संख्याबळ कमी असल्याने व प्रभावी पतंप्रधान आणि बहुमनधारी शासन अस्तित्वात असल्याने विरोधी लढा या काळात देणे तेवढेच सोपे नव्हते तरी देखील मधुदंडवते, मधुलिमये, मोरारजी देसाई, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी या सारख्या तत्वनिष्ठ राज्यकर्त्यांनी सत्ताधारी शासनाला घाम फोडण्याचे काम आपल्या कार्यकिर्दित पार पाडले.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासुन ते सन १९६७ पर्यंत देशात आणि सर्व घटकराज्यात काँग्रेस हाच पक्ष प्रबळ व प्रभावी होता. या काळात विरोधी पक्ष दुर्बल होता. परंतू १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांत विरोधी पक्षांनी आपआपल्या घटक राज्यात सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जनमत तयार करुन सत्तांतर

घडवून आणले आणि तब्बल आठ घटकराज्यात गैरकाँग्रेसची सरकारे सत्तास्थानी अरुढ झाली. याचा परिणाम केंद्र सरकारवही झाला परंतू या काळात असणाज्या पंतप्रधानांनी भूमिका ही अध्यक्षत्मक स्वरुपाची होती पंडित जवाहरलाल नेहरु, लाल बहादुरशास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी यासारखे प्रभावी व सत्ता केंद्रे एकवटणारे नेतृत्व देशाला लाभले. यामुळे या काळात व्यक्तीपुजेला अधिक प्रमाणात महत्व प्राप्त झाले. दुर्बल विरोधी पक्षामुळे सत्तांतर होण्यास भारतीयांना अनेक वर्ष वाट पहावी लागली. प्रभावी विरोधी पक्षांच्या अभावामुळे पंतप्रधानाची भुमिका ही अमेरीकन अध्यक्षांप्रमाणे बनली.

**विरोधी पक्षाचे स्थान :-**

ज्या प्रमाणे ज्हदयाशिवाय मानवाची, यंत्रशिवाय मशिनरीची आणि नावाडयाशिवाय जहाजाची कल्पना करता येणार नाही त्याप्रमाणे संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये विरोधी पक्षाशिवाय लोकशाहीची कल्पना करणे अशक्यतील बाब आहे. सत्ताधारी पक्षाच्या बेभान वृत्तीला लगाम घालण्याचे कार्य विरोधी पक्षाला पार पाडावे लागते. तसेच नियमानुसार कामकाज चालते किंवा नाही हे पाहण्यासाठी जबाबदारी व ते नियमानुसार पार पाडण्याची जबाबदारी विरोधी पक्षाला पूर्ण करावी लागते.

सन १९५० ते १९९० च्या दशकापर्यंत काँग्रेसपक्ष प्रभावी असल्याने या काळात विरोधी पक्षाला आपला प्रभाव पाडता आला नाही. त्याचप्रमाणे या काळात राजकारणातील नितीमुल्यांना काही प्रमाणात स्थान होते. पक्षनिष्ठा, पक्षादेश, तत्व यांना राजकारणात महत्वाचे स्थान होते. परंतू १९९० नंतर आघाडयांच्या राजकारणांनी जन्म घेतला व कोणत्याच एका पक्षाला सत्ता स्थापन करण्याइतपत संख्याबळ मिळणे अशक्यप्राय झाले. जशी सत्ताधारी पक्षाची स्थिती निर्माण झाली त्याचप्रमाणे विरोधी पक्षाची स्थिती निर्माण झाली. विरोधी पक्ष लहान लहान गटात विभागले गेले प्रत्येक पक्षांची ध्येयधोरणे, निष्ठा, तत्व वेगवेगळे असल्याकारणांनी विरोधी पक्षांची संघटीत मोट बांधणे अलिकडच्या काळात अशक्य झाले. याचा परिणाम म्हणून विरोधी पक्षाचा सत्ताधारी पक्षावरील प्रभाव कमी होत गेला. यामुळे देशातील लोकशाही संसदीय आहे की, असंसदीय असा प्रश्न जानकरांना अलीकडच्या काळात भेडसावू लागलेला दिसतो

**संसदीय लोकशाही आणि आघाडयांचे राजकारण :-**

१९७० च्या दशकानंतर भारतीय जनतेत राजकीय जागृती निर्माण होवू लागल्याने वेगवेगळया घटकराज्यात तेथील अस्मिता जोपासण्यासाठी छोटे-छोटे राजकीय पक्ष स्थापन झाले. बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल, उत्तरप्रदेशातील समाजवादी पक्ष, महाराष्ट्रातील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष, ओरीसातील जनता दल, तामिळनाडूतील दमुक आणि अण्णा द्रमुक, पंजाब मधील अकाली दल, झारखंडमधील झारखंड पक्ष, जम्मू काश्मिरमधील नॅशनल कॉन्फरंन्स, केरळमध्ये मुस्लिमलीग इत्यादी राजकीय पक्ष स्थानिक प्रश्न घेवून राजकारणात सक्रीय झाले व सार्वत्रिक निवडणुकांत आपले अस्तित्व निर्माण करु लागले याचा परिणाम गटा-तटाच्या राजकारणात होवून प्रबळ सत्ताधारीपक्ष व प्रबळ विरोधी पक्ष स्थापन होणे दुरापास्त झाले. यामुळे अलिकडच्या काळात राजकारण हे नितीहीन बनत जावू प्रबळ विरोधी पक्षाच्या अभावामुळे संसदीय लोकशाहीची पाळे-मुळे ढिले होवू लागले आणि लोकशाही प्रणाली धोक्यात आल्याचे चित्र सद्यस्थितीत निर्माण झाले आहे.

**विरोधी पक्षाचे स्वरुप व महत्व :-**

संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी बहुपक्ष पध्दती अस्तित्वात असणे चांगली बाबत आहे. अन्यथा लोकशाहीच्या बुरख्याखाली एका पक्षाची हुकुमशाही प्रस्तापित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकशाही शासन व्यवस्थेत अनेक राजकीय पक्ष असल्यास त्यांच्यामध्ये सत्ताप्राप्तीसाठी चाललेल्या संघर्षामुळे लोकहिताकडे दुर्लक्ष होण्याचा धोका संभावतो. त्यामुळे शासन अस्थिर बनते. सद्यस्थितीत भारतीय राजकारणातीलस्थिती पाहता विरोधी पक्ष गटा-तटात विभागला गेल्याने त्यांचाही शासनावर अंकुश राहिलेला दिसत नाही. तसेच सत्ताधारीपक्षही आघाडयांचा आधार घेवून स्थापन झाल्याने तोही संघटित व प्रभावी असलेला दिसत नाही तर सातत्याने वेगवेगळया मुद्यावरुन गुद्यावर येण्याचे प्रकार नेहमी घडतांना दिसतात. यामुळे लोकशाही व्यवस्था डळमळीत झाली आहे.

विरोधीपक्ष हा लोकशाही व्यवस्थेचा आत्मा असतो. लोकशाही शासनामध्ये प्रबळ विरोध हे सदृढ लोकशाहीचे घोतक आहे. उदा. अमेरिका, इंग्लंड इत्यादी जागरुक विरोधी पक्षामुळे सत्तारुढ पक्षाला सतत दक्ष राहावे लागते. सत्तारुढ पक्षाच्या चुका काढणे. त्या जनतेला समजावून सांगणे, सत्तारुढ पक्षाच्या चुकीच्या व जनता विरोधी निर्णयाला विरोध करणे, शासनाचे जनताविरोधी निर्णय जनतेसमोर मांडणे, जनमत आपल्या बाजुने वळविणे, सत्ताधारी पक्षाला अविश्वास ठरावाद्वारे पदच्युत करुन स्वतः सत्तारुढ होणे, शासनाच्या प्रत्येक कृतीवर लक्ष देणे, इत्यादी कार्ये विरोधी पक्षाला पार पाडावी लागतात. विरोधी पक्षामुळे सत्ताधारी पक्षाच्या कारभारावर सतत अंकुश असतो असा प्रभावी व संघटित विरोधी पक्ष असल्यास सत्तारुढ पक्ष कधीच मदांध होवू शकत नाही.

थोडक्यात देशाला हिटलरशाही पासून वाचवायचे असेल, देशातील व्यक्तीचे स्वातंत्र अबाधित राखायचे असेल तर देशामध्ये प्रबळ विरोधी पक्ष असला पाहिजे. शासनाचे निर्णय जनहित विरोधी कसे आहेत? हे दाखविण्यासाठी विरोधी पक्ष लोकशाही शासनात अत्यावश्यक ठरतो. प्रभावी व प्रबळ विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळेच लोकशाही शासन व्यवस्था यशस्वी होते

**संदर्भग्रंथ :-**

१. घांगरेकर चिं.ग. - भारतीय राज्यघटना स्वरुप आणि राजकारण, मंगेश प्रकाशन नागपूर-१०.
२. चौसाळकर अशोक - भारतातील प्रादेशिक पक्षांची भूमिका (साधना) १४ ऑगस्ट १९९९.
३. पळशीकर सुहास- समकालीन भारतीय राजकारणाचे विश्लेषण, मराठी वाचन साहित्य मालिका, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे.
४. प्रधान ग.प्र.- आघाडीच्या राजकारणातून संघटित अराजकतेकडे, (सकाळ - सप्तरंग १९ डिसेंबर २००४)
५. पाटील व्ही.बी. भारताची राज्यघटना, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

■■■

Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.